वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- मागील दि. २२/०६/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

ठराव / निर्णय :- दि.२२/०६/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कामय केलेल्या इतिवृत्ताचे वाचन करुन दुरुस्तीसह कायम करण्यात आले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ सभा सुचना क्र. १० दिनांक : १७/०७/२०२६

विषय :- प्रश्नोत्तरे.

अ.क्र.	सचिव कार्यालयास प्रश्न प्राप्त दिनांक	सदस्याचे संपूर्ण नाव व प्रभाग क्रमांक	प्रश्नाचे संक्षिप्त स्वरूप
१.	२६/०५/२०२६	श्री.अशोक शेळके, प्रभाग क्र.२२-अ	१.वसई विरार शहर महानगरपालिका परिक्षेत्रातील अतिधोकादायक/धोकादायक इमारतींच्या संख्या व वर्गवारी याबाबत माहिती. २.अतिधोकादायक/धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारी कार्यवाही (SOP) ३.अतिधोकादायक/धोकादायक इमारती निष्कसनाकरीता महानगरपालिकेमार्फत नियुक्त ठेकेदारांची यादी व कार्यप्रणाली.
२.	१३/०६/२०२६	श्री. अजित भोईर, प्रभाग क्र.२१-ड	मालमत्ता कर आकारणी प्रक्रियेमधील फाईल चालवणे / फाईल फिरवणे ही पध्दत बंद करुन प्रभाग स्तरावरच अंतिम कर आकारणी करण्याबाबत.
३.	१३/०६/२०२६	श्री. डॉमणिक रूमाव, प्रभाग क्र.१२-ड	शास्ती कर रद्द करण्याबाबत.
४.	१२/०६/२०२६	श्री. प्रफुल्ल साने, प्रभाग क्र.४-क	वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दि.०४ जुलै, २०२६ ते दि.०६ जुलै, २०२६ व दि.०८ जुलै, २०२६ रोजी मुसळधार पाऊस पडला व शहरातील अनेक भागात पाणी साचून रस्ते बंद झाले होते. अनेक नागरिकांच्या घरात पाणी साचले होते, लाईट बंद होती, मोबाईल नेटवर्क ही काम करीत नव्हते. अशा परिस्थितीत पिण्याचे पाणी मिळाले नाही. एकंदरीतच नागरिकांना पावसाचे पाणी साचल्यामुळे खूप त्रास झालेला आहे. या घटनेला धरून मी प्रशासनाला खालील प्रश्न विचारीत आहे. १. याबाबत प्रशासनाने काय काय कार्यवाही केली ? २.असा प्रसंग भविष्यात झाल्यास त्यावर मात करण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार आहें ? ३.असाच प्रसंग भविष्यात होऊ नये म्हणून काय उपाययोजना करणार आहे ? ४.आयआयटी व निरीने डिसेंबर २०१९ मध्ये दिलेला अहवाल आणि उपाययोजना त्यावर काय कार्यवाही केली? ५.मुसळधार पावसामुळे ज्या व्यापारांचे, दुकानदारांचे आणि नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यांचे पंचनामे करुन त्यांना शासनामार्फमत आर्थिक मदत देण्यात येणार आहे का ?

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३ सभा सुचना क्र. १० दिनांक : १७/०७/२०२६

विषय :- शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.

ठराव/निर्णय :-

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान अभियानांतर्गत कामांची निवड व स्पर्धेचे निकष निश्चित करण्याबाबत.

शासान निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१२/नवि-१६ (ई-१५३६२७०), दिनांक २५/०६/२०२६.

वरिल शासकीय प्रत्र व्यवहाराची माहिती व प्रत प्राप्त झालेली आहेत असे एकमताने मान्य केले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहा.आयुक्त यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.

प्रभाग समिती "एच" नवघर माणिकपूर आस्थापनेवरील अधिकारी श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहाय्यक आयुक्त, यांनी मुख्यालयात दि. २७/०३/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज आस्थापना विभागात दि. १७/०४/२०२६ रोजी प्राप्त झालेला आहे. श्री. विजय शिंदे, सहा. आयुक्त यांची मुळ आस्थापना प्रभाग समिती "एच" नवघर माणिकपूर असल्याने सदरचा त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव प्रभाग समिती "एच" नवघर माणिकपूर विभागाने सादर करणे आवश्यक असल्याने कार्या. जावक क्र. व.वि.श.म./आस्था/४७७/२०२६, दि. ०७/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग समिती "एच" कार्यालयास पत्र देऊन त्यांचा स्वेच्छा सेवानिवृत्तीचा अर्ज प्रभाग समिती "एच" कार्यालयात वर्ग करुन त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव कालमर्यादेपूर्वी सादर करण्याचे कळविलेले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने प्रभाग समिती "एच" नवघर माणिकपूर यांनी दि. १९/०५/२०२६ रोजीच्या कार्यालयीन प्रस्ताव / टिपणी अन्वये श्री. विजय शिंदे यांचा स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत प्रस्ताव / टिपणी मुख्यालय विरार आस्थापना विभागात सादर केला आहे. (विभागात प्राप्त दि. २१/०५/२०२६, मुळ सेवा पुस्तक प्राप्त दि. २७/०५/२०२६).

श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहाय्यक आयुक्त,, यांची पंचायत सभा दि. १९/१०/१९९१ ठराव क्र. १७० (२६) नुसार लिपिक म्हणून दि.०१/११/१९९१ पासून नियुक्ती करणेत आली. दि.१६/०६/१९९५ चा आदेश क्रमांक एमसीके-१०९४/सी आर-५४८/९४/३ नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेशानुसार माहे ०५/०५/१९९४ पासून तृतीय श्रेणी-९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० लागू करणेत आली. (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, असाधारण क्र.४०, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ०३ जुलै २००९ ची अधिसुचना व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९३ संक्रमणकालीन तरतुदीमधील ५ (क) नुसार श्री. विजय जगन्नाथ शिंदे, यांची सेवा दि. ०३ जुलै २००९ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये वर्ग करण्यात आलेली आहे.

लिपिक संवर्गात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची अंतिम जेष्ठता सूची दि. १६/०८/२०१६ रोजी प्रकाशित झाली. त्यानुसार जेष्ठता अर्हता आणि अनुभव विचारात घेऊन श्री. विजय जगन्नाथ शिंदे, यांना वरिष्ठ लिपिक पदावर कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आस्था/१२०५/१७/१८, दि. ०३/०२/२०१८ नुसार पदोन्नती देण्यात आली असून वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी ५२००-२०२००-ग्रेड पे ४२०० लागू करण्यात आली आहे. दि.०१/०१/२०२० रोजी अंतिम जेष्ठता सुची नुसार जेष्ठता अर्हता आणि अनुभव विचारात घेऊन अधिक्षक पदावर कार्यालयीन आदेश क्र.आस्था/७३८ दि.२८/१२/२०२१ अनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. अधिक्षक संवर्गातील जेष्ठतेनुसार प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सहाय्यक आयुक्त या पदावर जा.न.वविशम/आस्था/११४२/२०२४०, दि.०२/०९/२०२४ अन्वये अधिक्षक संवर्गातील कर्मचारी श्री. विजय जगन्नाथ शिंदे, यांना पदोन्नती पदस्थापना देण्यात आली.

श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहाय्यक आयुक्त, हयांची नेमणूकीपासून ते सध्याच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत अशी एकूण ३४ वर्ष ४ महिने सेवा बजावली आहे. त्यांचे सध्याचे वय ५४ वर्ष असून त्यांची प्रकृती साथ देत नसल्यामुळे त्यांना स्वेच्छानिवृत्ती हवी आहे. तसे त्यांनी अर्जात नमुद केलेले आहे. श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहा. आयुक्त यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील कलम ६६ नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत पोट नियम (१) मध्ये नमूद केल्यानुसार स्वेच्छानिवृत्ती करीता शासकीय कर्मचाऱ्यानी दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल, मात्र उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेल्या कालावधी संपण्यापूर्वी (म्हणजेच अर्जाच्या तारखेच्या तीन महिन्याच्या आत) नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवा निवृत्तीसाठी परवानगी दिल्यास नकार दिला नाही तर त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अमलात येईल.

सबब, श्री. विजय जगन्नाथ शिंदे, सहाय्यक आयुक्त, यांना स्वेच्छा सेवानिवृर्तीस महानगरपालिका स्तरावर परवानगी देण्यात आल्यानंतर त्यांना सेवानिवृत्ती नंतरचे सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, उपदान, रजा रोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

तरी श्री. विजय जगन्नाथ शिंदे,, सहाय्यक आयुक्त यांना स्वेच्छा सेवानिवृर्तीच्या अर्जावर महानगरपालिका स्तरावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- आस्थापना विभागाकडून दि. १७/०७/२०२६ च्या महासभेत मांडण्यात आलेल्या श्री. विजय शिंदे यांच्या स्वेच्छा निवृत्तीच्या प्रस्तावावर विस्तृत चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती निवडणूक आयोगाकडून सध्या सुरू असलेल्या SIR (Special Intensive Revision / विशेष संक्षिप्त पुनरीक्षण) या अत्यंत महत्त्वाच्या प्रशासकीय कामासाठी करण्यात आलेली आहे. हे काम निवडणूक आयोगाच्या वेळेत व पारदर्शकपणे पूर्ण करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. सदर प्रस्ताव श्री. विजय जगन्नाथ शिंदे यांची स्वेच्छा निवृत्ती निवडणूक आयोगाचे SIR चे कामकाज पूर्ण होईपर्यंत 'स्थगित' ठेवण्यात यावी. तसेच निवडणूक आयोगाचे SIR मधील काम पूर्ण झाल्यानंतर, आस्थापना विभागाने सदर कर्मचाऱ्याच्या स्वेच्छा निवृत्तीचा प्रस्ताव पुनश्च महासभेच्या पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यांत यावा असे निर्देशन देण्यात आले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहा.आयुक्त यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.

प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) आस्थापनेवरील अधिकारी श्रीम, निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त, यांनी मुख्यालयात दि. १६/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज आस्थापना विभागात दि. १७/०४/२०२६ रोजी प्राप्त झालेला आहे. श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त, यांची मुळ आस्थापना प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) असल्याने सदरचा त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) विभागाने सादर करणे आवश्यक असल्याने त्यांना कार्या. जावक क्र. व.वि.श.म./आस्था/४७८/२०२६,दि.०७/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) कार्यालयास पत्र देऊन त्यांचा स्वेच्छा सेवानिवृत्तीचा अर्ज प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) कार्यालयात वर्ग करुन त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव कालमर्यादेपूर्वी सादर करण्याचे कळविलेले होते. सदरचे पत्र देऊनसुध्दा प्रस्ताव प्राप्त न झाल्याने प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) कार्यालयास कार्या. जावक क्र. वविशम/आस्था/६२४/२०२६, दि. २७/०५/२०२६ रोजी स्मरणपत्र देण्यात आले. सदर पत्रांच्या अनुषंगाने प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प.) यांनी दि.१७/०५/२०२६ रोजीच्या कार्यालयीन प्रस्ताव/टिपणी अन्वये श्रीम. निलाक्षी राजन पाटील, यांचा स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत प्रस्ताव / टिपणी मुख्यालय विरार आस्थापना विभागात सादर केला आहे. (विभागात प्राप्त दि. २९/०५/२०२६)

श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त, यांची ग्रा.पं. सभा दि. १३/०१/१९९० ठराव क्र. ९४ (८) द्वारा तृत्तिय श्रेणीच्या पदावर कारकून पदी दि.१५/०१/१९९० पासून कामावर हजर करुन ९५०-२०-EB-११५०-२५-१५०० वेतनश्रेणीनुसार कायम करण्यात आले होते. श्रीम. निलाक्षी राजन पाटील, लिपिक यांना नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४४२, दि.२८/०२/१९९७ अन्वये नगरपरिषदेच्या आस्थापनेवर संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, नविन प्रशासन भवन यांचेकडील आदेश क्र. एमसीके १०९७ प्र.क्र. १०९७ प्र.क्र. १०५/९७/४ दि. ०४ ऑगस्ट ९७ अन्वये दि. २६/०१/१९९० पासून नगरपरिषदेच्या मंजूर आस्थापनेवर सामावून समाविष्ठ करण्यात आले होते.

श्रीम. निलाक्षी राजन पाटील, यांना वसई विरार शहर महानगरपालिका सेवा, सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ दि.०९ सप्टेंबर २०१४ च्या वर्गीकरण नियम ४ नुसार वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता, जेष्ठता व पात्रता धारण करणाऱ्या लिपिक टंकलेखकाकडून विहीत पध्दतीने हरकती सुचना मागवून दि. १६/०८/२०१६ रोजी अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर जेष्ठता यादीनुसार लिपिक टंकलेखक यांना वरिष्ठ लिपिक पदावर वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीनुसार पदोन्नती देण्यात आली होती.

श्रीम. निलाक्षी राजन पाटील, यांना कार्यालयीन आदेश क्र. ७२६/२०२१ दि. २३/१२/२०२१ अन्वये वरिष्ठ लिपिक पदावरुन अधिक्षक या पदावर सेवा जेष्ठता, अर्हता, बिंदू नामावली विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आली होती.

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध दि. ०९/०९/२०१४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेला आहे. त्यास अनुसरुन अधिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ तसेच दि. ०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णय प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन सहाय्यक आयुक्त या पदावर मानीव दिनांकासह पदोन्नती देण्यास मा. पदोन्नती समितीच्या दि. १२/०२/२०२४ च्या बैठकीत शिफारस केलेली आहे. प्रशासकीय ठराव क्र. ३११७ दि. १४/०२/२०२४ अन्वये शिफारस मंजूर करण्यात आली असून त्या अनुषंगाने श्रीम. निलाक्षी राजन पाटील यांना मानीव दिनांकासह पदोन्नतीचा आदेश क्र. वविशम/आस्था/१०१२/२४, दि. १२/०८/२०२४ नुसार अधिक्षक संवर्गातील कर्मचारी यांना सहा. आयुक्त या पदावर पदोन्नतीने पदस्थापना शासन मान्यतेच्या अधिन राहून देण्यात आलेली आहे.

श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त, हयांची नेमणूकीपासून ते सध्याच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत अशी एकूण ३६ वर्ष ३ महिने सेवा बजावली आहे. त्यांचे सध्याचे वय ५५ वर्ष असून सद्यस्थितीत त्यांना त्रास होत असल्याने मला काम करणे कठीण होत आहे त्यामुळे त्यांना स्वेच्छानिवृत्ती हवी आहे. तसे त्यांनी अर्जात नमुद केलेले आहे. श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहा. आयुक्त यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील कलम ६६ नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत पोट नियम (१) मध्ये नमूद केल्यानुसार स्वेच्छानिवृत्ती करीता शासकीय कर्मचाऱ्यानी दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिका-याने स्वीकारणे आवश्यक असेल, मात्र उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेल्या कालावधी संपण्यापूर्वी (म्हणजेच अर्जाच्या तारखेच्या तीन महिन्याच्या आत) नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवा निवृत्तीसाठी परवानगी दिल्यास नकार दिला नाही तर त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अमलात येईल.

सबब, श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त, यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीस महानगरपालिका स्तरावर परवानगी देण्यात आल्यानंतर त्यांना सेवानिवृत्ती नंतरचे सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, उपदान, रजा रोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

तरी श्रीम. निलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त यांच्या दिनांक १६/०४/२०२६ रोजीच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीच्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यात आला.

ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या दि. १७/०७/२०२६ च्या महासभेतील विषय सूचीवरील प्रस्तावावर या सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सदर चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, वसई-विरार शहर महानगरपालिकेत वर्ग-२ च्या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची मोठी कमतरता आहे. तसेच श्रीमती नीलाक्षी राजन पाटील, सहाय्यक आयुक्त यांच्या शासकीय सेवेचा अंदाजे ३ वर्षांचा कालावधी अद्याप शिल्लक आहे. पालिकेचा प्रशासकीय कारभार सुरळीत चालण्यासाठी आणि नागरी सेवांवर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी या अनुभवाचा पालिकेस उपयोग होणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर परिस्थिती लक्षात घेता श्रीमती नीलाक्षी राजन पाटील यांचा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज एकमताने नामंजूर करण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/~~मंजूर~~/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- भूतपूर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत (OPS) समाविष्ट करुन त्याच्या लाभ मिळणेबाबत.

शासन नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ०३/०७/२००९ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका अस्तिवात आल्यामुळे सदर अधिसूचनेत नमूद केलेल्या ४ नगरपरिषदा व ५३ ग्रामपंचायती यांचे समावेशन वसई विरार शहर महानगरपालिकेत केले आहे. त्याअनुषंगाने त्या संबंधित नगरपालिका व ग्रामपंचायती मध्ये कार्यरत कर्मचारी यांचे महानगरपालिकेत समावेशन करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक १२/०१/२००७ नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांची सेवा निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवरील नसल्याने मा. सर्व साधारण सभा ठराव क्र.६ दिनांक ३१/०८/२०१९ च्या ठरावानुसार सदर कर्मचा-यांना परिभाषित निवृत्तीवेतन अंशदान योजना (DCPS) लागू करण्यात आलेली आहे.

सदर ठरावाच्या विरुध्द श्री अशोक शंकर मांद्रे व इतर ६१ कर्मचारी यांनी त्यांची नियुक्ती ०१/११/2२००५ पूर्वीची असल्याने त्यांना जुनी पंशन योजना (OPS) लागू करण्याबाबत उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. १८३२०/२०२४, दि.०१/१०/२०२४ अन्वये याचिका दाखल केली होती. सदर याचिकेच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दि. ०३/०३/२०२५ रोजी निर्णय दिला आहे.

सदर न्याय निर्णयात नमूद केले आहे की,

१. **There are no details about each of these Petitioners pertaining to their service/employment.**
२. **The learned Advocate for the Petitioners submits that at this juncture, that the Petitioners may be permitted to file individual representations, setting forth their service details and make a prayer for the old pension scheme. Such representations would be filed in terms of the Government Resolution dated 2 nd February, 2024.**
३. **In view of the above, this Writ Petition is disposed off as withdrawn on instructions.**
४. **Let each Petitioner set out his own service details in all respects and move a representation to the Competent Authority mentioned in the Government Resolution dated २nd February, 2024. Let such representations be filed within a period of 30. days from today.**
५. **The Government Resolution provides six months time for carrying out the scrutiny and for deciding such applications. Let such applications be decided on their own merits, within the timeline prescribed. If any application is rejected, reasons for rejection may be mentioned in such individual orders to be communicated to each of the Petitioners.**

१. या प्रत्येक याचिकाकर्त्यांच्या सेवा/नोकरीसंबंधी कोणताही तपशील उपलब्ध नाही.
२. याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी सादर केले आहे की, या टण्यावर याचिकाकर्त्यांना त्यांच्या सेवेचा तपशील देऊन आणि जुन्या निवृत्तीवेतन योजनेसाठी विनंती करून वैयक्तिक निवेदने दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी. अशी निवेदने २ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासकीय ठरावानुसार दाखल केली जातील.

३. उपरोक्त बाबी लक्षात घेता, निर्देशांनुसार ही रिट याचिका मागे घेण्यात आल्याने निकाली काढण्यात येत आहे.

४. प्रत्येक याचिकाकर्त्याने आपल्या सेवेचा सर्व तपशील देऊन, दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासकीय ठरावात नमूद केलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे निवेदन सादर करावे अशी निवेदने आजपासून ३० दिवसांच्या कालावधीत दाखल करावीत,

५. शासकीय ठरावानुसार अशा अर्जाची छाननी करण्यासाठी आणि त्यावर निर्णय घेण्यासाठी सहा महिन्यांया कालावधी देण्यात आला आहे. अशा अर्जावर विहित मुदतीत, त्यांच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जावा. जर कोणताही अर्ज नामंजूर झाला, तर नामंजुरीची कारणे प्रत्येक याचिकाकर्त्याला कळिवण्यात येणाऱ्या स्वतंत्र आदेशांमध्ये नमूद करावीत.)

त्यानुसार त्यांनी नगरविकास विभागाकडे निवेदने/तक्रार अर्ज विहित कालावधीत सादर केले होते. नगरविकास विभागाकडील दि. २४/०४/२०२४ चे पत्रान्वये सदर तक्रार अर्ज/विनंती अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करुन अर्जदारांना परस्पर कळविण्याबाबत महानगरपालिकेला कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४९३ परिशिष्ट ४ मधील अनुक्रमांक ५ (क) प्रमाणे स्थानिक प्राधिकरणाच्या नोकरीत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी पूर्वी दिलेली सेवा ही महानगरपालिकेच्या सेवेत असताना केलेली सेवा आहे असे मानले जाईल अशी नियमात तरतूद आहे. अर्जात नमुद सर्व कर्मचाऱ्यांची दि.०१/११/२००५ पूर्वी कायम स्वरुपी नियुक्ती झालेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या उपरोक्त तरतुदीनुसार तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचा-यांची सेवा ही महानगरपालिकेची सेवा गणली असून त्यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांका पासून महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार वेतन भत्ते व सेवेचे सर्व अनुषंगिक लाभ अदा करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४९३ अंतर्गत संक्रमणीय तरतुदीनुसार ग्रामपंचायत सेवेमधून महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अन्वये जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या भुतपूर्व ग्रामपंचायती मध्ये दि.०१/११/२००५ पुर्वी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना जुन्या पेन्शन योजनेत (OPS) समाविष्ट करुन त्याचा लाभदेण्यासंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) अन्वये गठित करण्यात आलेल्या निवड समितीची बैठक गुरुवार दि.२५/०६/२००६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. आयुक्त महोदय यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये निवड समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२४ च्या शासन आदेशातील तदतुदीच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ लागू करण्यात येत आहे.

२. संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात "महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982 लागू असा आवश्यक शेरा नोंदविण्यात यावा,

३. निवृत्तीवेतन, उपदान व इतर सेवानिवृत्ती लाभांची कार्यवाही प्रचलित नियमांनुसार करण्यात यावी.

४. ज्या कर्मचा-यांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथिलता आवश्यक आहे, त्यांचे प्रस्ताव शासनाकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात यावेत.

५. सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील एकूण ६२ कर्मचा-यांपैकी ४६ कर्मचा-यांचे नियुक्तीचा ठराव / आदेश व इतर कागदपत्रे सादर केले असून तशा त्यांच्या सेवा पुस्तकामध्ये नोंदी आहेत. तथापी १६ कर्मचा-यांची नियुक्तीचा ठराव /आदेश व इतर कागदपत्रे उपलब्ध झालेलो नाहीत. परंतु त्यांच्या नियुक्तीच्या व कायम

केल्याच्या नोंदी त्यांच्या सेवा पुस्तकात आहेत. सदर कर्मचा-यांची सेवा त्यांच्या मेवा पुस्तकातील नोंदीनुसार ग्राहय धरण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या भूतपूर्व घामपंचायत मधील दि.०१/११/२००५ पूर्वी कार्यरत असलेल्या श्री. अशोक शंकर मांद्रे व इतर ६१ कर्मचा-यांना जुन्या निवृत्ती योजनेत (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२) समाविष्ट करुन त्यानुसार अनुषंगिक लाभ अदा करण्यास निवड समितीने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या भूतपूर्व प्रामपंचायतीमध्ये दि.०१/११/२००५ पुर्वी कार्यरत असलेल्या श्री. अशोक शंकर मांद्रे व इतर ६१ कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत समाविष्ट करुन त्यानुसार त्याना देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात शिफारस करण्यात येत आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या भूतपूर्व ग्रामपंचायत मधील दि.१/११/२००५ पूर्वी कार्यरत असलेल्या श्री. अशोक शंकर मांद्रे व इतर ६१ कर्मचा-यांना जुन्या निवृत्ती योजनेत ("महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982) समाविष्ट करुन त्यानुसार अनुषंगिक लाभ अदा करणेबाबत निवड समितीने घेतलेल्या निर्णयानुसार १ ते ५ बाबींची कार्यवाही करण्यात यावी. तथापि सदर निर्णयातील मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने (वय क्षमापनाबाबत) शासन नगरविकास विभाग पत्र दि. २२/०६/२०२६ अन्वये महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५१ ते ५५ मधील तरतुदी शासनाचे प्रचलित धोरणे व त्याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश यांचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन महापालिकेच्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आल्यामुळे ३ कर्मचाऱ्यांचे वय क्षमापनास मंजूरी देऊन श्री. अशोक शंकर मांद्रे व इतर १४१ अशा एकूण १४२ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार महानगरपालिकेत समाविष्ट करुन त्यांना जुन्या पेन्शन योजनेचे ("महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982) अनुषंगिक सेवा निवृत्तीविषयक सर्व लाभ प्रदान करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

Ajeev

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401303
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

ठराव क्र. :- ०७ विभाग :- क्रीडा विभाग

दिनांक :- १७/७/२६

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा व शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका, क्रीडा विभागा मार्फत दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांच्यातील सुक्त कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांचा शारीरिक व बौधिक विकास व्हावा हे उद्दिष्ट समोर ठेवून सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा (अंदाजीत एकुण ६ ते ८ दिवस स्पर्धेचे आयोजन) व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे (अंदाजीत एकुण ६० ते ७० दिवस स्पर्धेचे आयोजन) आयोजन क्रीडा विभागामार्फत दरवर्षी करण्यात येते.

सन २०२५-२६ या वर्षात सदर प्रस्तावात नमूद स्पर्धा आयोजनासाठी मंजुर मा.प्रशासकीय ठराव क्र.९२५ दि.०७/०७/२०२५ अन्वये खर्चाचा तपशील व सन २०२६-२७ या वर्षी आयोजित होणाऱ्या स्पर्धा कार्यक्रमावर अंदाजित अपेक्षित खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	खर्चाची बाब	२०२५-२६ मध्ये मंजुरी घेतलेली रक्कम	सन २०२६-२७ करीता प्रस्तावित अंदाजित रक्कम
१	सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता पंच, परिक्षक, मैदान सेवक, डाटाएन्ट्री ऑपरेटर, स्वयंसेवक मानधन याबाबींवर खर्च	१२१८९००	१४३८४००
२	सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता मेडल, ट्रॉफी, क्रीडा साहित्य, स्टेशनरी व प्रिटींग साहित्य पुरविणे त्या अनुषंगीक इतर बाबींवरील खर्च	१९८५१२६	१९८५१२६
३	सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता मंडप, साऊंड, लाईट्स, जनरेटर व्यवस्था खर्च	५५१७५३८	५२०००००
४	सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता खानपान करिता खर्च	८०३७२८	११०००००
५	सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी करिता खर्च	४२२३२२	२०००००
	एकुण खर्च	**९९,४७,६१४/-**	**९९,२३,५२६/-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता प्रस्तावात नमूद प्रमाणे स्पर्धांचे व अनुषंगीक कार्यक्रमांचे आयोजन करणेकामी खालील बाबींवर खर्च होणार आहे.

१) छपाई व स्टेशनरी (प्रवेशिका,प्रशस्ती पत्रक,आमंत्रण पत्रिका, पंचपरिक्षक स्वयंसेवक बिल्ले, कुपन्स, रिझल्ट शिट, आवाहन पत्रके,स्टिकर्स व इतर छपाई) व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

२) प्रसिद्धी (विनीयर स्टीकर,बॅनर व लाकडी फ्रेमसह बॅनर, होर्डींग्स, केबल व वृत्तपत्रे) व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

३) फोटोग्राफी व व्हीडीओ शुटींग,थेट प्रक्षेपण, व्हिडिओ जाहिरात,चित्रफित व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

४) स्पर्धकांच्या अर्जाचे ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीकरण करणे, जाहिरात, डिजिटल जाहिरात व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

५) पाणी/ एनर्जी ड्रिंक्स/ औषधे/ व्हीटॅमिन्स व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

६) प्रमुख पाहुणे यांचेसाठी स्मृतीचिन्हे व विजेत्यांसाठी ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

७) पुस्तके,शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व इतर आवश्यक खर्च.

८) मानधन (स्पर्धा परिक्षक,पंच, मैदान सेवक, स्वयंसेवक, डाटाइन्ट्री ऑपरेटर, क्रीडा विभाग शिक्षक, कला विभाग शिक्षक व कलाकार मानधन व प्रवास भत्ता इ.) व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

९) स्पर्धा आयोजन समितीच्या बैठकांना चहापान व नाश्ता व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१०) भोजन व्यवस्था,कार्यालयीन खर्च,भत्ते व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

११) वाहतुक व्यवस्था खर्च व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१२) स्टेज,कमानी, उद्घाटन व समारोप साठी लागणारे साहित्य मंडप, साऊंड सिस्टीम, लाईटींग, डेकोरेशन व्यवस्था, जनरेटर व्यवस्था, मोबाईल टॉयलेट, सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही यंत्रणा, बॅरिकेड्स व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१३) सेक्युरिटी व बाऊन्सर, वॉकी टॉकी व्यवस्था, इलेक्ट्रीक साहित्य व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१४) स्पर्धेचे प्रमोशन करणेकरिता जिंगल, प्रोमो व्हिडिओ, व्हिडिओ जाहिरात अनाउन्समेंट ॲड, माहितीपट तयार करणे व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१५) उद्घाटन कार्यक्रम व समारोप कामी फटाके व इतर व्यवस्था व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१६) बिस्कीट / चॉकलेट व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१७) प्रथमोपचार साहित्य व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१८) स्पर्धेचे आर्टवर्क तयार करणे व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

१९) क्रीडा साहित्य खरेदी व किरकोळ साहित्य व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

२०) क्रीडा पुस्तिका छपाई व इतर अनुषंगीक व आवश्यक खर्च.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता प्रस्तावात नमूद प्रमाणे स्पर्धेचे व अनुषंगीक कार्यक्रमांचे यशस्वीपणे करणेकामी, प्रस्तावातील नमूद बाबींवर अंदाजित रक्कम रुपये ९९,२३,५२६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात क्रीडा विषय राखीव तरतुदी अंतर्गत आंतरशालेय कला क्रीडा महोत्सव या लेखाशिर्षाखाली रु.६ कोटी इतकी तरतूद केली असून नगरविकास विभागाकडील दिनांक. ०९ मार्च १९९८ रोजीच्या शासन निर्णयान्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (११) अन्वये तरतुद आहे.

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षांत वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा व शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी व त्याकामी येणाऱ्या एकुण अंदाजीत रुपये ९९,२३,५२६/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे.

तसेच सन २०२६-२७ या वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजनासाठी प्रस्तावात नमूद आवश्यक बाबींचे वार्षिक मंजुर निविदाकार यांना कामाचे कार्यादेश देऊन कामे करुन घेण्यासाठी,याचबरोबर ज्या बांबीकरिता वार्षिक दर मंजूर नाहीत अशां करिता दरपत्रके, ई-निविदा मागविण्याकामी सदरचा प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

प्रस्तावाचा ठराव / निर्णय - सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा, शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धा, विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धा, राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करणेकामी व त्याकामी येणाऱ्या एकूण अंदाजित रक्कम रु. ९९,४७,६१४/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रस्तावात नमूद सर्व साहित्यापैकी ज्या साहित्याचे वार्षिक दर मंजूर आहेत असे साहित्य महानगरपालिकेच्या मंजूर निविदा-धारकाकडून कार्यादेश देऊन खरेदी करणे तसेच ज्या साहित्याचे दर मंजूर नाहीत अशी साहित्य दरपत्रक/ ई-निविदा मागवून खरेदी करण्यात यावे. परंतु दि.०३ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या विभागीय क्रीडा स्पर्धा सुरु होणार आहे. त्यामुळे सुब्रोतो मुखर्जी कप ही स्पर्धा दि.०३ ऑगस्ट यापुर्वी घेणे अनिवार्य आहे. परंतु कार्यक्रमासाठी लागणारे मंडप व क्रीडा विषयक सर्व साहित्याचा निविदा कालावधी संपुष्टात आलेला आहे. तसेच मंडप व क्रीडा विषयक सर्व साहित्य दरपत्रक मागवून खरेदी करणेकामी कमी कालावधी असल्यामुळे सुब्रतो मुखर्जी कार्यक्रमासाठी लागणारे क्रीडा विषयक साहित्य सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात क्रीडा विभागाचे मे.एस.के. स्पोर्ट्स व्हेंचर या संस्थेस पुर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढ देऊन खरेदी करण्यात यावे परंतु सद्यस्थितीत त्याचे असलेले मंजूर दर जास्त वाटप असल्याने या निविदाधारकांसोबत वाटाघाटी करुन दर निश्चित करावे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये खरेदी करण्यात यावे. त्यासाठी उक्त नमूद रु.९९,४७,६१४/- इतका खर्चा मधून अंदाजित रक्कम रु. २० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता आजची सभा प्रशासकीय वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नाव – प्रफुल्ल साने

व स्वाक्षरी –

अनुमोदकाचे नाव – अभय कक्कड

व स्वाक्षरी

अनकूल संख्या ---------- प्रतिकूल संख्या ---------- तटस्थ संख्या----------

-----ठराव /सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पद्मावती यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण सभा
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401303
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

ठराव क्र. :- ०८

विभाग :- क्रीडा विभाग
दिनांक :- १७/०७/२०२६

प्रस्तावाचा विषय :- वसई तालुका कला-क्रीडा महोत्सव स्पर्धा २०२६ आयोजनासाठी वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांना वित्त सहाय्य देणेबाबत मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) ही नोंदणीकृत संस्था असुन गेली ३६ वर्षे अखंडपणे सुरु आहे. वसई तालुक्यातील कला व क्रीडा गुणांना व्यासपीठ मिळावे या भावनेतून वसई तालुका कला-क्रिडा महोत्सवाची सुरूवात १९९० साली झाली. ४५०० स्पर्धकाच्या सहभागाने सुरू झालेला महोत्सवात कला विभागात ३३ स्पर्धा प्रकार व क्रीडा विभागात ३७ स्पर्धा प्रकार असे दोन्ही मिळून एकुण ७० स्पर्धा प्रकाराचे या कला क्रीडा महोत्सवात आयोजन केले जाते. मागील वर्षी कला क्रीडा महोत्सवात सुमारे ६५ हजाराहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. दरवर्षी २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत या कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून वसई विरार शहरातून फार मोठ्या प्रमाणात खेळाडू निर्माण झाले आहेत. आज पर्यंत कला क्रीडा महोत्सवातून अनेक क्रीडापटू व कलाकार यांनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या तालुक्याचे, जिल्हाचे, राज्याचे व देशाचे नाव गाजवले आहे. वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) या संस्थेचे वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवाची "लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्" व "गोल्डन बुक ऑफ रेकॉर्डस्" मध्ये नोंद झाली आहे.

वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवामुळे वसई तालुक्यातील कला क्रीडा खेळाडूंचा स्तर उंचावल्याचे दिसत आहे. सदर संस्थेस प्रोत्साहन देणे या कामी व सन २०२६ च्या कला-क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करणेकामी रुपये १ कोटी वित्त सहाय्य देणेकामी उपरोक्त संदर्भीय अर्जानुसार वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांनी महानगरपालिकेस विनंती केलेली आहे. यामध्ये कला क्रीडा स्पर्धा नोंदणी फॉर्म छपाई, पंच परिक्षक मानधन, चहापान /भोजन व्यवस्था,मंडप/स्टेज/खुर्च्या/साऊंड सिस्टीम/विद्युत व्यवस्था,क्रीडा साहित्य, मैदान व्यवस्था, फोटोग्राफ/व्हिडीओ चित्रिकरण, प्रसिद्धी व जाहिरात खर्च,फ्रेमसह बॅनर छपाई, करमणुकीचे कार्यक्रम,जनरेटर व्यवस्था, विजेता स्पर्धक प्रमाणपत्र,मेडल,जिल्हा संघटना मानधन यासह इतर किरकोळ अनुषंगीक बाबींवर खर्च होणार आहे. याबाबत खर्चाचे अंदाजपत्रक सोबत जोडले आहे.

वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ यांना कला क्रीडा महोत्सव स्पर्धा आयोजनासाठी यापूर्वी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत सन २०२२, सन २०२३, सन २०२४ या वर्षात दिलेल्या वित्त सहाय्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	वित्तीय वर्ष	संस्थेचे नाव	स्पर्धा आयोजना करिता दिलेला निधी
१	सन २०२२	वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.)	८० लक्ष
२	सन २०२३	वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.)	८० लक्ष
३	सन २०२४	वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.)	१ कोटी

तसेच शासनच्या नगरविकास विभागाकडील दिनांक ०९ मार्च,१९९८ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकांनी विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करणे व खेळाडुंना बक्षिस देणे व उपरोक्त स्पर्धाचा खर्च महानगरपालिकेने स्वत:च्या उत्पनातुन भागवावा असे नमुद आहे.

क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यामध्ये, तसेच खेळांचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये एकविध खेळ संघटना मोलाचा वाटा उचलतात. त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी महानगरपालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात "क्रीडा विषयक राखीव तरतुद अंतर्गत क्रीडा संस्थांना व व्यायाम शाळांना योजने अंतर्गत वित्तीय सहाय्य वसई कला-क्रीडा महोत्सव वित्तीय सहाय्य" या लेखाशिर्षा अंतर्गत (लेखा संकेतांक - ५४६-२७४२०२) रुपये २ कोटी ५० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (११) अन्वये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी तरतूद आहे.

तरी ३७ वा वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करणेकामी वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ या संस्थेस वसई तालुका कला-क्रीडा महोस्तव २०२६ आयोजनासाठी रुपये १ कोटी इतके वित्त सहाय्य देणेकामी प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदर प्रस्तावास विचार विनिमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव :- माहे डिसेंबर,२०२६ मध्ये होणाऱ्या वसई तालुका कला-क्रीडा महोत्सव २०२६ चे आयोजन यशस्वीरित्या करणेकामी रुपये १ कोटी इतके वित्त सहाय्य वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ यांना देणेकामी ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव – प्रफुल्ल साने

व स्वाक्षरी –

अनुमोदकाचे नाव – प्रविण मोदी

व स्वाक्षरी

अनकूल संख्या ---- — ---- प्रतिकूल संख्या ---- — ---- तटस्थ संख्या---- —

-ठराव /सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव ~~पद्मावती~~ यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण सभा
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401303
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

ठराव क्र. :- ०९

विभाग :- क्रीडा विभाग
दिनांक :- ९७/०७/२०२६

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत १३ व्या राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०२६ चे यशस्वी आयोजन करणेकामी व त्याकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका, क्रीडा विभागामार्फत दरवर्षी राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले जाते. या महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे यंदा १३ वे वर्ष आहे.

तालुक्यातील खेळाडुंना राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या समवेत खेळण्याची संधी मिळावी, त्यांचा दर्जा पाहता यावा, व्यायामाची नागरीकांमध्ये व खेळाडूंमध्ये आवड निर्माण करुन त्यांना तंदुरुस्ती आजमावता यावी, खेळातील सहभाग वाढावा यासाठी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन व्यापक स्वरुपात करण्यात यावे. तसेच तालुका व जिल्हास्तरावर असे उपक्रम भव्य प्रमाणात खाजगी संस्था व शासन यांच्या सहभागातून घेण्यात यावे असे महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ मध्ये नमूद आहे.तसेच शासनच्या नगरविकास विभागाकडील दिनांक ०९ मार्च,१९९८ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकांनी विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करणे व खेळाडूंना बक्षिस देणे व उपरोक्त स्पर्धेचा खर्च महानगरपालिकेने स्वत:च्या उत्पनातुन भागवावा असे नमूद आहे.

महानगरपालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महापौर मॅरेथॉन (५ टक्के क्रीडा राखीव तरतुद) (७२०-२७४२०३) या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रुपये ५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (११) अन्वये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी तरतूद आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका सातत्याने विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन यशस्वीरित्या करीत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातून राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू निर्माण होणेस मदत होत आहे.

सबब राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचे नियोजन करणेसाठी खालील बाबींवर खर्च होणे अपेक्षित आहे.

१ स्पर्धेचे इव्हेंट मॅनेजमेन्ट करणे, शालेय स्पर्धेचे इव्हेंट मॅनेजमेन्ट करणे व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

२ मॅरेथॉन करिता स्पॉन्सरशीप शोधणे, स्पर्धेचे मार्केटिंग व पीआर करणेकामी अनुभवी एजन्सीची नियुक्ती करणेकामी व इतर आवश्यक तसेच अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

३ मॅरेथॉन स्पर्धेचे आर्टवर्क करणे व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

४ मॅरेथॉन स्पर्धेसाठी विविध वयोगटांत वितरित केली जाणारी रोख बक्षिसांची रक्कम, गिफ्ट व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

५ मॅरेथॉन स्पर्धेचे प्रमोशन करणेकरिता जिंगल,मॅरेथॉन थिम सॉन्ग,प्रोमो व्हिडिओ, व्हिडिओ जाहिरात, अनाउन्समेन्ट ॲड तयार करणे व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

६ स्पर्धा मान्यता शुल्क ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया(दिल्ली),महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटना (पुणे), पालघर जिल्हा ॲथलेटिक्स असोशिएशन व इतर आवश्यक प्राधिकरणाचे परवानगी शुल्क.

७ प्रसिद्धी टी.व्ही, केबल, रेडिओ, वृत्तपत्रे, बस व बस स्थानके वरील जाहिराती, सोशल मिडीया तसेच व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

८ मॅरेथॉन स्पर्धेची वेबसाईट तसेच मोबाईल मार्केटिंग सोल्यूशन व्यवस्थापन, स्पर्धेचे ऑन लाईन

नोंदणीकरण, लॅपटॉप, संगणक व प्रिन्टर्स, स्कॅनर्स, डिजिटल क्लॉक, इंटरनेट व यासंबधीत इतर व्यवस्था, चेस्ट नंबर, टायमिंग चिप, विमा व त्या अनुषंगीक बाबी, विविध स्पर्धा प्रकाराचे फॉर्म, प्रमाणपत्र व फ्लॅक्स बॅनर्स छपाई, बॅराकेटींग टेप, मॅरेथॉन रुट कलर मॅप छपाई, स्टेशनरी साहित्य, ओळखपत्र, कलर झेरॉक्स छपाई व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च, स्पंज, बर्फ खरेदी व्यवस्था, स्वयंसेवक, पदाधिकारी व कर्मचारी यांना देण्यासाठी टी-शर्ट, टोप्या, ट्रॅकसुट, पॉन्चोस, गणवेश खरेदी व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च. कार्यालयीन खर्च, कुरिअर खर्च, टपाल खर्च, भत्ते, दुरध्वनी व्यवस्था व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

९ सुरक्षा व्यवस्था, स्पर्धा मार्गावर मेडिकल स्टेशन व इतर आवश्यक ठिकाणी महिला व पुरुष सिक्युरिटी (बाऊन्सर), फायर एस्टींग्युशर, मेटल डोअर डिटेक्टर, वॉकी टॉकी व्यवस्था, बॅगेज स्कॅनर,इलेक्ट्रीक साहित्य व इतर अनुषंगीक साहित्य व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला खर्च.

१० वैद्यकीय व्यवस्था- विविध प्रकारची औषध, ॲम्बुलन्स, कारडिॲक ॲम्बुलन्स भाडे, डॉक्टर्स, नर्स व त्यांचे सहकारी यांचे मानधन व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

११ कार्यक्रमासाठी विविध ठिकाणी स्टेज, मंडप,फुलांची सजावट, विद्युत जनरेटर, गेट्स,कमानी, बॅरेकेटींग व फ्लाईंग साऊंड स्टिस्टीम व्यवस्था, मोबाईल टॉयलेट, एलईडी टीव्ही व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

१२ व्हिडीओ शुटींग, फोटोग्राफी व स्पर्धेचे लाईव्ह टेलीकास्ट करणे कामी लागणारे साहित्य व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च

१३ स्पर्धा आयोजन समितीच्या बैठकाना चहा पान, नाश्ता, खानपान व्यवस्था, अल्पोपहार, फ्रुट्स, सिलबंद पाणी/एनर्जी ड्रिंक्स/औषधे/व्हीटॅमिन्स इत्यादी

१४ विजेत्या स्पर्धकांना तसेच स्पर्धा वेळेत पुर्ण करणा-या खेळाडुंना मेडल्स, स्मृतीचिन्ह व प्रमुख पाहुण्यांना देण्यासाठी स्मृतीचिन्ह व इतर आवश्यक अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च

१५ प्रिटींग बॅनर व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च

१६ इव्हेंट ॲम्बेसिडर, प्रमुख पाहुणे, खेळाडू, पंच, पायलट, विशेष कार्यकारी व्यक्तींचे मानधन, खानपान व्यवस्थेसाठी स्वयंसेवक, ऑफिशियल्स मानधन व स्वयंसेवक इत्यादींना राहण्याची व्यवस्था तसेच प्रवासभत्ता व मानधन व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

१७ मॅरेथॉनचे कामकाजासाठी वाहन भत्ता, वाहतुक भाडे खर्च व इतर आवश्यक च अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

१८ अकास्मित, किरकोळ व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

मॅरेथॉन स्पर्धा २०२६ या करिता होणारा अंदाजीत खर्च खालील तक्त्यात नमूद आहे.

अ.क्र	कामाचे नाव	२०२४-२५ या वर्षी झालेल्या खर्च	२०२६-२७ या वर्षी अंदाजीत होणारा खर्च
१	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे स्पर्धा परवानगी शुल्क अदा करणेबाबत.	८४०००/-	८४०००/-
२	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेसाठी पारितोषिकांची रक्कम	५८९३९५०/-	५८९३९५०/-
३	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेकरिता इव्हेंट ॲम्बेसेडर, निवदेक, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय तांत्रिक निरीक्षक मानधन, विशेष कार्य करणा-या व्यक्तींचे मानधन खानपान व्यवस्थेसाठी मुख्य ऑफिशियल्सचे मानधन, पायलट, बक्षिस समारंभासाठी ऑफिशियल्स मानधन, स्वयंसेवक मानधन, निरीक्षक,ऑफिशियल्स	२१५६२६८/-	२१५६२६८/-

अ.क्र	कामाचे नाव	२०२४-२५ या वर्षी झालेल्या खर्च	२०२६-२७ या वर्षी अंदाजीत होणारा खर्च
	व इतर व्यक्तीचे मानधन अदा		
४	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे इव्हेन्ट मॅनेजमेंट,पीआर व मार्केटिंग करणे व इतर तत्सम कामे करणेबाबत	१९७५०००/-	१९७५०००/-
५	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे आर्टवर्क व इतर तत्सम कामे करणेबाबत	८३०००/-	८३०००/-
६	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेच्या प्रसिद्धी करिता *जिंगल, थिम सॉन्ग व इतर तत्सम कामे करणेबाबत*	१३५३३२०/-	१३५३३२०/-
७	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचेसुरक्षा रक्षक व सुरक्षा उपकरणे पुरविणे व इतर तत्सम कामे करणेबाबत	१२६११५०/-	१२६११५०/-
८	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे साहित्य, स्टेशनरी, बॅग, मेडल, स्पर्धेचे फॉम छपाई करणे व इतर तत्सम कामे करणेबाबत	३४८४८५९/-	३४८४८५९/-
९	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेकरिता व्ही.आय.पी, नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी, स्वंयसेवक, पायलट इ यांना टी-शर्ट व इतर तत्सम कामे करणेबाबत	१४९२९७०/-	१४९२९७०/-
१०	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा करीता स्पर्धेचे बॅनर छपाई करणे व इतर तत्सम कामे करणेबाबत	२०३३७०४/-	२०३३७०४/-
११	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा करीता स्पर्धेचे फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी व इतर तत्सम कामे करणेबाबत	२०४०९६७/-	२०४०९६७/-
१२	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा करीता स्पर्धेचे जेवण, चहापान, भोजन व पाणी व्यवस्था करणेबाबत	२३०४९६४/-	२४०४३७५/-
१३	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा वसई व विरार येथे शासकीय अधिकारी / एलिट धावपट्टू / पाहुणे / इतर धावपट्टू यांच्या निवास, खानपान व इतर तत्सम कामे करणेबाबत	१४९९६६२/-	१५०००००/-
१४	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा करीता स्पर्धेचे स्टेज मंडप व इतर साहित्य भाड्याने पुरवठा करणेबाबत	१११३३४३७/-	१११३३४३७/-
१५	राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा करीता वाहन व परिवहन व्यवस्थेवर झालेला खर्च	१२०००००/-	१२०००००/-
	एकूण रक्कम	**३,९५,००,२५१/-**	**३,९६,००,०००/-**

राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे अ.क्र. १ ते अ.क्र. १५ या करिता सर्व मिळून एकत्रित अंदाजित रक्कम रुपये ३,९६,००,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी श्याण्णव लक्ष) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच स्पर्धेसाठी रक्कम वाढ झाल्यास त्या खर्चाची वाढीव रक्कमेचा प्रस्ताव स्वतंत्र सादर करण्यात येईल. या स्पर्धेला जास्तीत जास्त प्रायोजक मिळाल्यास स्पर्धा आयोजनावरील होणाऱ्या खर्चात नक्कीच बचत होणार आहे.

तरी माहे डिसेंबर २०२६ मध्ये राष्ट्रीय १३ व्या राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनास व त्याकामी होणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ३,९६,००,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी श्याण्णव लक्ष)

इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे.

तसेच प्रस्तावात नमूद आवश्यक बाबींची निविदा मागवून यशस्वी निविदाकारास त्यांना कामाचे कार्यादेश देऊन कामे करुन घेणेकामी सदरचा प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा.महासभेची अंतिम मान्यता आवश्यक असल्याने सदरचा विषय मा.महासभेत ठेवण्यात आला होता.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत १३ व्या राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन २०२६ चे यशस्वी आयोजन करणेकामी रक्कम रुपये ३,९६,००,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी श्याण्णव लक्ष) इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

उक्त नमूद प्रस्तावातील अनुषंगीक बाबींसाठी ई-निविदा / दरपत्रक मागवून यशस्वी निविदा धारकांसोबत करारनामा करून तसे कार्यादेश देऊन कामे करून घेणेकामी सदरचा प्रस्तावास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव – प्रफुल्ल साने

व स्वाक्षरी –

अनुमोदकाचे नाव – प्रविण शेट्टी

व स्वाक्षरी

अनकूल संख्या ---------- प्रतिकूल संख्या ---------- तटस्थ संख्या----------

-----ठराव /सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पद्मावती यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण सभा
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
मा. सर्वसाधारण सभा

ठराव क्र. :- १० दिनांक :-१७/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागास २ नग आधुनिक हायड्रोलिक लॅडर व ४ बोलेरो वाहन खरेदी करुन त्यावर हायड्रोलिक लॅडर बसविणे व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागामार्फत शहरातील रस्ता दुतर्फा असलेल्या झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम केले जाते. सदर कामे करणेकरिता वृक्षप्राधिकरण व उद्यान विभागाकडे सद्यपरिस्थितीत ९ प्रभाग समिती करिता १ हायड्रोलिक लॅडर वाहने कार्यरत आहेत. तसेच संदर्भ क्र. ०२ नुसार विद्युत विभागाअंतर्गत असलेले वाहन सुध्दा अत्यावश्यक सेवेत कार्यरत असल्याने निर्लेखित करण्यात येत असून याठिकणी देखील हायड्रोलिक लॅडरची कमतरता भासत आहे. सद्यस्थितीत या ठिकाणी भाडे तत्वावर वाहन पुरवठा करणेत आलेले आहे. तसेच मा. आयुक्त महोदय यांच्या दि. /०७/२०२५ रोजीच्या वृक्षप्राधिकरण विभागाच्या आढावा बैठकीत त्यांचे विभागास हायड्रोलिक लॅडर कमी प्रमाणात असल्याने कामकाज करणे शक्य होत नाही, असे मा. आयुक्त महोदयांना सांगितले. त्यानुसार मा. आयुक्त महादेय यांनी नवीन वाहने खरेदी करणेचे निर्देश दिले. त्याबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये वृक्षप्राधिकरण विभागाने नवीन वाहने खरेदी करणेबाबतचे पत्र देखील दिलेले आहे.

सदर वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे :

अ.क्र.	वाहन क्रमांक	उंची	बहुउद्देशिय किंवा कसे ?	होणारा वापर
१	एम एच ४८ बी एच-३७१६	१५ मी.	होय	रस्त्यावरील लाईट (दिवा) दुरुस्ती करणेसाठी महावितरण मंडळाची वीजसेवा वारंवार खंडीत न करता केवळ पहिल्या वेळेस बंद करुन दिव्यांची दुरुस्ती वाहनावर असलेल्या जनरेटरने तपासणी करुन करता येते. यामुळे (दिवा) दुरुस्ती परस्पर करणेस मदत होते. झाडे कापण्यासाठी वुड कटर मशिन इतर ठिकाणाहून मागणी करणेची आवश्यकता नसेल तसेच ही वुड कटर मशिन इलेक्ट्रीक पध्दतीची असल्यामुळे ह्याला इंधनाची आवश्यकता नाही. त्यामुळे काम जलद गतीने होईल. महापालिका ईमारतीची काच धुणे, स्मारके, झाडे धुणे इ. कामे वेळोवेळी केली जातील.
२	एम एच ०४ ए एम -१३१	१३ मि.	नाही	सदरचे वाहन १५ वर्ष पूर्ण झालेले असून त्याबाबत निर्लेखनाची प्रक्रिया करणेकामी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी पत्र दिल्यामुळे सदर वाहनाचा वापर बंद करण्यात आलेला आहे.
३	एम एच ०४ ए एम ०२०७	१३ मी.	नाही	सदरचे वाहन १५ वर्ष पूर्ण झालेले असून त्याबाबत निर्लेखनाची प्रक्रिया करणेकामी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी पत्र दिल्यामुळे सदर वाहनाचा वापर बंद करण्यात आलेला आहे.

परंतु, उपरोक्त ३ पैकी ०१ वाहनांमार्फत कामकाज करणेस अडचणी निर्माण होऊन कामे वेळेत पूर्ण होत नसल्याकारणाने स्थानिक नागरिक, संस्था व पदाधिकारी यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. करिता वृक्षप्राधिकरण व उद्यान विभागाकरिता ६ नग हायड्रोलिक लॅडर वाहने खरेदी करणेकामी मा. आयुक्त महोदय यांनी सूचना केलेली आहे.

प्राप्त मंजूरीनुसार ६ हायड्रोलिक लॅडर वाहन खरेदी करतेवेळी मुख्य रस्त्याशेजारील असलेल्या झाडांची छटाई करणेसाठी २ नग ९०९ ह्या चेसीजवर हायड्रोलिक लॅडर शिडी व्हील्स टेलीस्कोप बुम या पध्दतीची पुढील तक्त्यात नमुद केलेल्या विवरणानुसार वाहने खरेदी करणे योग्य होईल.

नव्याने बदल करुन मंजूर करणेचा तपशिल			**आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित असलेल्या हायड्रोलिक लॅडर शिडी (गाडी)पासून होणारा फायदा**
अ.क्र.	**तपशील**	**क्षमता**	
१	जनरेटर	५ के.वी	रस्त्यावरील लाईट (दिवा) दुरुस्ती करणेसाठी महावितरण मंडळाची वीजसेवा वारंवार खंडीत न करता केवळ पहिल्या वेळेस बंद करुन दिव्यांची दुरुस्ती वाहनावर असलेल्या जनरेटरने तपासणी करुन करता येते. यामुळे (दिवा) दुरुस्ती परस्पर करणेस मदत होते.
२	वुड कटर मशिन	इलेक्ट्रीक	झाडे कापण्यासाठी वुड कटर मशिन इतर ठिकाणाहून मागणी करणेची आवश्यकता नसेल तसेच ही वुड कटर मशिन इलेक्ट्रीक पध्दतीची असल्यामुळे ह्याला इंधनाची आवश्यकता नाही. त्यामुळे काम जलद गतीने होईल.
३	पाण्याची टाकी (पाईप व वॉटर मिस्ट स्प्रेयींग गन सह)	४०० लिटर	महापालिका ईमारतीची काच धुणे, स्मारके, झाडे धुणे इ. कामे वेळोवेळी केली जातील.
४	कॅपिसिटी	२०० कि.ग्रॅ	
५	हाईट्स	१५ मीटर	
६	प्लॅटफॉम हाईटस्	१३.५ मीटर	
७	बॉस्केट साईझ	१००० x १०६० x ७६० मीटर	
८	आऊटरिच	६.५ मीटर	
९	स्लिवींग रिच	३६०	
१०	बास्केट इन्सुलेशन	२२०० वोल्ट	

तसेच उर्वरित ४ हायड्रोलिक लॅडर वाहने कमी आकाराची खरेदी केल्यास सदर वाहनामार्फत कमीत कमी जागेच्या ठिकाणी जाऊन शहराच्या ग्रामीण व अंतर्गत भागातील वृक्ष छटाईची कामे करणे सहज शक्य होईल. त्यासाठी खालील तक्त्यात नमुद विवरणानुसार वाहने खरेदी करणे योग्य होईल.

वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे :-

बोलेरो पिकअप १.७T वाहनावर ११ मीटर उंच (जमिनी पासून ११ मीटर उंचीपर्यंत) हायड्रोलिक लॅडर चा तपशील खालीलप्रमाणे :

अ.क्र.	विशेष विवरण	तपशील
१	Working height from ground	11.0 mtr. (minimum)
२	Platform height from ground	9.0mtr.(minimum)
३	Platform Capacity	200 kg. (minimum)
४	Platform Size	1.1 x0.7 x 1.1 M (LBH)
५	Outreach	3.6 M
६	Turn table rotation	360 degree
७	Controls	Hydraulic
८	Hydraulic pressure system	160 Bar
९	Basket size	1.1M x 0.7 Mx 1.1m
१०	Working pressure	150 Bar

उपरोक्त प्रकारची सर्व वाहने खरेदी करणेकामी नामांकित कंपन्यांकडून संदर्भ क्र. ०३ अन्वये दरपत्रक मागविण्यात आलेले असून ते खालीलप्रमाणे :

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	हायड्रोलिक लॅडर उंची	मे.एस.टी.मोटर्स	मे. श्रेयस सेल्स अँड सर्व्हिस कॉर्पोरेश	मे.आवटे फॅब्रिकेटर्स ऑटोमोबाईल वर्क
१	हायड्रोलिक लॅडर ९०९ चेसीज व्हील्स टेलिस्कोप बुम	१५ मी	४४४७७००	४४४१५००	४३६६१५७
२	१.७ टन बोलेरो पिकअप चेसीज हायड्रोलिक लॅडर	११ मी.	२९१७२००	२८६६०००	२७७५०००

वरील प्राप्त दरपत्रकानुससार मे. आवटे फॅब्रिकेटर्स अँड ऑटोमोबाईल वर्क यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी आहेत. परंतु, मे. एस.टी.मोटर्स यांचे दर पहाता ते सर्वात जास्त असून अंदाजपत्रकिय रक्कम घेणेकामी २ नग ९०९ ह्या चेसीजवर हायड्रोलिक लॅडर शिडी व्हील्स टेलीस्कोप बुम या पध्दतीची हायड्रोलिक लॅडर खरेदी करणेकामी अंदाजित र.रु. ८८,९५,४००/- इतका खर्च अपेक्षित असून ०४ नग बोलेरो पिकअप १.७T वाहनावर ११ मीटर उंच (जमिनी पासून ११ मीटर उंचीपर्यंत) हायड्रोलिक लॅडर खरेदीसाठी अंदाजित र.रु १,१६,६८,८००/- असे एकूण र.रु. २,०५,६४,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त ६ नग हायड्रोलिक लॅडर वाहनास लागणारा प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे र.रु. २,०५,६४,२००/- लक्ष पर्यंतचा खर्च सन २०२४-२५ मधील उद्यान व नागरी वनीकरणासाठी वाहन व हायड्रोलिक वाहन खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत सदरचा खर्च करता येईल.

तरी वृक्षप्राधिकरण व उद्यान विभागासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून १६ ते १९ टन चेसीजवर २ नग आधुनिक (जमिनी पासून १५ मीटर उंचीपर्यंत) हायड्रोलिक लॅडर खरेदी करणे व ४ नग बोलेरो पिकअप १.७T

वाहनावर ११ मीटर उंच (जमिनी पासून ११ मीटर उंचीपर्यंत) वाहन खरेदी करून त्यावर हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.२,०५,६४,२००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेस सदरचा मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस शिफारस करणेत येत आहे.

ठराव / निर्णय :- वृक्षप्राधिकरण व उद्यान विभागासाठी ई-निविदा प्रक्रियेव्दारे / जीईएम पोर्टलव्दारे १६ ते १९ टन चेसीजवर २ नग आधुनिक (जमिनी पासून १५ मीटर उंचीपर्यंत) हायड्रोलिक लॅडर खरेदी करणे व ४ नग बोलेरो पिकअप १.७T वाहनावर ११ मीटर उंच (जमिनी पासून ११ मीटर उंचीपर्यंत) वाहन खरेदी करून त्यावर हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी होणाऱ्या अंदाजित र.रु. २,०५,६४,२००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- ---------- प्रफुल्ल साने ----------

अनुमोदक :- ---------- मनोज पाटील ----------

अनुकुल संख्या---------- — ---------- प्रतिकुल संख्या---------- — ---------- तटस्थ संख्या---------- —

ठराव सर्वानुमते मंजुर

(अजीव पाटील)
महापौर तथा पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण सभा
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नव्याने तयार करणेत आलेल्या आकृतीबंधाला मंजुरी मिळणेबाबत.

ठराव / निर्णय :- सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

प्रफुल्ल साने

सुचक -

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्वर्ट बांधणे या कामास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्वर्ट बांधणे या कामास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे ठराव/क्र. २२२४, दि. ०५/०२/२०२५ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे. तद्नंतर मा. शहर अभियंता यांचेमार्फत दि. ०७/०२/२०२५ अन्वये रक्कम रू. २,९४,२६,११७/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून ई-निविदा प्रणालीद्वारे दि. १७/०२/२०२५ अन्वये सदरची निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यानंतर मा. निविदा समिती सभेत पहिल्या लखोटयास दि. २०/०३/२०२५ व दुस-या लखोटयास दि. १५/०४/२०२५ अन्वये मान्यता देणेत आली. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र. १७४ दि. २९/०४/२०२५ अन्वये मे. हमीद जे. शेख यांच्या ४.९५% जादा दराच्या निविदेस दर मंजूरी प्राप्त झाली.

त्यानुसार मंजूर निविदाधारक मे. हमीद जे. शेख यांचे मार्फत महानगरपालिकेने दिलेल्या जा.क्र. वविशम/बांध/शअ/२८३/२०२५ दि.०९/०५/२०२५ रोजीचे कार्यादेशानुसार सदरचे कामास सुरूवात करणेसाठी लाईन आऊट देण्यात आली. त्यानुसार सदरचे काम सुरू केले. तद्नंतर प्रत्यक्ष कामाच्या जागेवर लाईन आऊट घेऊन कामास सुरूवात केली परंतु कामाचे अंदाजपत्रक व जागेवरील परिस्थिती यामध्ये तफावत असल्याचे आढळून आले. सद्यस्थितीत प्रस्तावित अंदापत्रकातील तरतूदीनुसार काम करताना प्रत्यक्ष कामामध्ये तांत्रिक दृष्टया अडचणी येत आहेत. त्यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्णत्वास जाऊ शकत नाही व वाढीव बाबींचा समावेश केल्याशिवाय काम पूर्ण होऊ शकत नाही.

सदरचे काम हे मुख्य रस्त्यावर असून सदर ठिकाणी वाहतूक मोठया प्रमाणात सुरू असते. तसेच सदर ठिकाणी पर्यायी रस्ता नसल्याने काही प्रमाणात वाहतूक थांबवून म्हणजे रस्त्याच्या एका बाजूला खोदाई करून दुसऱ्या बाजूने वाहतूक सूरू ठेवून सदरचे काम करावे लागणार आहे. सदर रस्ता हा मुख्य रस्ता असल्यामुळे अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्ता खचण्याची होती व त्यामुळे अपघात होऊन जिवित हानी होण्याची शक्यता आहे. तसेच सदर जागेत Soil टेस्ट केल्यानंतर अहवालाप्रमाणे Soil Bearing Capacity कमी आढळून आली आहे (सोबत Trial Pit चा अहवाल जोडला आहे). Soil टेस्टींगच्या अहवालानंतर सदर कामाच्या ठिकाणी एका बाजूला खोदाई करून दुसऱ्या बाजूने वाहतूक सुरू ठेवून खोदकाम करण्यासाठी व रस्ता वाहतुकीस सुरू राहण्यासाठी Shore pilling करणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष जागेवरील नायगाव स्टेशन पूर्वेकडील ब्रिजच्या उतारावरील भागाजवळ असलेल्या पाईप कल्वर्टची रुंदी ९.०० मी. असल्याने त्याच साईजचे बॉक्स करणे आवश्यक होते. त्यानुसार दोन ठिकाणी ९.०० मी. रुंद व २ ठिकाणी ४.०० मी. रुंदीचे काम करणे आवश्यक आहे. तसेच जुना डांबरी रस्ता व कल्वर्टच्या स्लॅबची उंची वाढल्यामुळे वाहतुक सुरु करण्यासाठी दोन्ही बाजूला जोड रस्ता (Approch Road) करणे गरजेचे आहे. या सर्व आवश्यकतेनुसार Shore pilling, Coffer Dam, GSB, Pavement Quality Cocrete (PQC) M-40 for approach road व ६०० मी. मी. व्यासाचे पाईप गटार या बाबींचा नव्याने अंदाजपत्रकात समावेश करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर कामाच्या अंदाजपत्रकातील नमुद वाढीव बाबी व अतिरीक्त बाबींची वाढ झाली. त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष काम सुरू केलेले आहे व कामाचा ५०% भागाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच स्टारसिटी ते उघाडीपर्यंत पाईप गटार बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित होऊन रस्त्यावर पाणी साचणार नाही तसेच रस्ता खराब होणार नाही.

सर्व बाबीचा आढावा घेतल्यानंतर मूळ अंदाजपत्रकापेक्षा नव्याने प्रस्तावित कामाचा खर्च वाढीव स्वरूपाचा होत आहे. मूळ अंदाजपत्रकामध्ये मूळ अंदाजपत्रकातील बाबीचे दर हे सन २०२२-२३ च्या राज्य दर सूचीप्रमाणे तयार करण्यात आले होते. अतिरीक्त बाबी नव्याने समाविष्ट करण्यात आल्याने बाबींचे दर हे सन २०२२—२०२३ च्या राज्य दरसूची मधील दराप्रमाणे घेण्यात आलेले आहेत.

मूळ निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% इतकी जास्त देकाराची होती. तथापि, नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या बाबीसाठी वाढीसाठी वर्ष २०२२-२३ च्या दरसूचीतील दर विचारात घेण्यात आले असून त्यामध्ये

४.९५% जादा दर वाढीचा समावेश करण्यात आलेला नाही. मात्र वाढीव काम नव्याने अंदाजपत्रक तयार केले नंतरच पूर्ण करता येणे शक्य आहे.

अशा सर्व कारणांमुळे प्रत्यक्ष अंदाजपत्रकातील लागणा-या आवश्यक बाबी व अंदाजपत्रकाव्यतिरीक्त अतिरीक्त बाबी अशा सर्व बाबींचे मिळून रक्कम रू. ५,५६,४७,४१२/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

कामाच्या भौतिक वावात होणारी वाढ.

मूळ काम	सुधारीत काम
आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट	आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट व कॉक्रीट रोड
१ गाळा प्रत्येकी ४ मी.	२ आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट १८.०० x ९.०० मी. २ आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट १८.०० x ४.०० मी.
लांबी – १५ मी.	लांबी - १८.०० मी.
रूंदी – ४ मी.	रूंदी - ९ मी. रूंदी - ४ मी.
	अतिरीक्त बाबी- Shore pilling, Cofer Dam, GSB, Pavement Quality Concrete (PQC) M-40 for approach road व ६०० मी.मी. व्यासाचे पाईप गटार

मुळ प्रशासकीय मान्यते नुसार आर्थिक विश्लेषण

कामाची मुळ किंमत (GST वगळुन)	रु.२,४३,७९,१५८/-
१८% GST	रु.४३,८८,२४८/-
इतर	रु.६,५८,७११/-
एकूण	रु.२,९४,२६,११७/-

सुधारीत अंदाजपत्रकाचे आर्थिक विश्लेषण :-

स्विकृत निविदेनुसार वाढीव कामासह कामाची किंमत (GST वगळुन)		रु. ३,३२,९४,८०८/-
(+) ४.९५% जादा दर		रु. १६,४८,०९३/-
एकूण किंमत (GST वगळुन)	A	**रु. ३,४९,४२,९०१/-**
अतिरिक्त बाबींची एकूण किमंत(GST वगळुन)	B	**रु. १,१३,४२,०७८/-**
एकूण किंमत (GST वगळुन)	A + B	**रु. ४,६२,८४,९७९/-**
१८% GST		रु. ८३,३१,२९६/-
कामगार विमा कर १%		रु. ३,४९,४२९/-
गौण खनिजाचे स्वामित्व धन व इतर तांत्रिक सल्लागार		रु. ६,६९,३८८/-
मटेरीयल तपासणी शुल्क फी		रु. १२,३२०/-
एकूण सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम	C	**रु. ५,५६,४७,४१२/-**

वरीलप्रमाणे कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम **रू. ४,६२,८४,९७९/-** होत असून १८% जी.एस.टी कामगार विमा, गौण खनिज मिळून एकूण रक्कम **रू. ५,५६,४७,४१२/-** इतकी होत आहे.

सदर सुधारीत अंदाजपत्रक त्रयस्थ यंत्रणेकडून क्षेत्रिय पाहणीसह पडताळणी करून घेतली असता त्रयस्थ यंत्रणेमार्फत सादर केलेले अंदाजपत्रक किंमत **रू. ५,५६,४७,४१२/-** इतकी आहे व बांधकाम विभागाने सादर केलेले सुधारीत अंदाजत्रक साईट कंडीशन नुसार वाजवी आहे असा अभिप्राय दिला आहे.

सदर नाल्यामध्ये नायगाव (प.) येथील बाभोळा, उमेळा गाव, नायगाव पूर्वेतील परेरानगर परिसरातील वाहत येणारे पावसाळी पाणी हे सदरच्या होणाऱ्या कल्व्हर्ट मधून वाहत नायगाव (पू) च्या खाडीमध्ये दिशेने जाणार असल्याने नायगाव पश्चिम तसेच नायगाव पूर्व येथील वरील नमुद परिसरातील पावसाळी पाण्याने जलमय होणा-या परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित रित्या होईल. त्याअनुषंगाने सदरचे काम हे पावसाळयापूर्वी पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

सदरचा खर्च "विकास निधी अंतर्गत इतर विकास कामे" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीनुसार करण्यात येईल. चालू आर्थिक वर्षात सुधारीत अंदाजपत्रकाद्वारे योग्य ती तरतूद करण्याची दक्षता घेण्यात येईल तसेच वित्तीय वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सदर कामाकरीता आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

यापूर्वी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या ठराव/ क्र. २२२४ दि. ०५/०२/२०२५ अन्वये रू. २,९४,२६,११७/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर कामात उपरोक्त प्रमाणे करावयाचा बदल विचारात घेता रक्कम रू.४,६२,८४,९७९/- च्या वाढीसह (GST सकट) एकूण रक्कम रू. **५,५६,४७,४१२/-** इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.
तरी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका क्र. १३४ व ३१३ नुसार सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम तसेच सेवाकर (GST) व अतिरीक्त बाब मिळून एकूण रक्कम **रू. ५,५६,४७,४१२/-** इतक्या रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार मूळ ठेकेदार यांचेकडून पावसाळ्या अगोदर काम करून घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणेसाठी सविनय सादर.

ठराव / निर्णय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्व्हर्ट बांधणे कामी प्रशासकीय मान्यता रक्कम तसेच सेवाकर (GST) व अतिरीक्त बाब मिळून एकूण रक्कम **रू. ५,५६,४७,४१२/-** इतक्या रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार मूळ ठेकेदार यांचेकडून पावसाळ्या अगोदर काम करून घेणेकामी येणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - (कुन्हैया ओईर)

अनुमोदक - (प्रफुल्ल साने)

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- महानगरपालिकेच्या वैधानिक समित्यांचे कामकाज पारदर्शक, उत्तरदायी व नियमबद्ध पद्धतीने चालण्यासाठी समित्यांच्या बैठकांना संबंधित जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्याऱ्यांची अनिवार्य उपस्थिती सुनिश्चित करण्याबाबत.

ठराव / निर्णय :- मा. श्री. हितेश जाधव यांनी सादर केलेल्या, परंतु त्यांच्या अनुपस्थितीत श्री. नारायण मांजरेकर (सूचक) व डॉ. योगिता करंजकर (अनुमोदक) यांनी मांडलेल्या विषयावर चर्चा करताना महानगरपालिकेच्या सर्व वैधानिक समित्यांच्या बैठकांना विषयसंबंधित सर्व जबाबदार अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे आणि सदस्यांना आवश्यक ती सर्व माहिती तातडीने उपलब्ध करून दिली जावी. अशा सुचना मा.महापौर महोदयांकडून सभागृहात देण्यांत आल्या आहे.

सुचक - नारायण मांजरेकर
मांजरेकर

अनुमोदक - डॉ. योगिता करंजकर
Yogawali
31/08/2026

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

Agarwal

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई - विरार शहर महानगरपालिका
मा. सर्वसाधारण सभा

प्रस्तावाचा ठराव क्र. :- १४ **दिनांक:-**१७ /०७/ २०२६

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत नळजोडणी धारकांना दिल्या गेलेल्या वाढीव देयकांवर चर्चा करून सदर देयके रद्द करणेबाबत.

मा. सदस्य सौ. प्रज्ञा पाटील, व मा. सदस्य श्री. अशोक शेळके यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये पुढील प्रमाणे प्रस्ताव चर्चेकरीता आणण्याची विनंती मा. महापौर यांच्याकडे दि.०३/०७/२०२६ रोजीच्या पत्रान्वये केली.

"वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत अधिकृत नळ जोडणी धारकांना माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या आर्थिक वर्षात देण्यात आलेली देयके ही जवळपास मागील वर्षाच्या तुलनेत दुप्पट रकमेची असून नागरिकांवर त्याचा नाहक भार पडत आहे. ही बाब अन्यायकारक असून सामान्य नागरिकांमध्ये या करवाढीविरोधात प्रचंड रोष आहे. त्याचा तीव्र सामना लोप्रतिनिधी म्हणून आम्हाला सहन करावा लागत आहे. सदर करवाढ ही तातडीने रद्द करावी, अशी जनतेची मागणी आहे. सदर प्रस्तावाची सूचना येत्या महासभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करून त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे. त्यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा घडवून हा विषय बहुमताने मंजूर करण्यात यावा."

वरील उपस्थित विषयाबाबत प्रशासनाने पॉवरपॉईंट प्रेसेंटेशन (PPT) व्दारे सादरीकरण व स्पष्टीकरण दिले ते पुढील प्रमाणे आहे.

- वसई विरार शहर महानगरपालिकेची तत्कालीन चार नगरपरिषदा व सभोवतालच्या ५३ गावांचा समावेश होऊन दि. ३ जुलै, २००९ रोजी स्थापना झाली आहे.
- लोकसंख्या - सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२२ लक्ष सद्याची अंदाजे २५ लक्षहून अधिक
- सद्याची पाण्याची मागणी - ४६९.६३ द.ल.ली.
- उपलब्ध पाणी - ४०० द.ल.ली.
- सद्य:स्थितीत होणारा पाणी पुरवठा

अ. क्र.	योजना	एकूण प्रतिदिन होणारा पाणी पुरवठा (द.ल.ली)
१	पेल्हार	१०
२	उसगांव	२०
३	सुर्या टप्पा -१	१००
४	सुर्या टप्पा - ३	१००
५	MMRDA सुर्या ४०३	१७० पैकी सद्या १५० द.ल.ली./दिन
एकूण		३८०

- पाणी पुरवठ्यावरील महसुली खर्च (रु. लाखात)

वर्ष	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५	२०२५-२६
पाणीपुरवठा स्थायी/अस्थायी अस्थापना	३३२.८२	३९७.५२	४२४.९९	४३०.८३	४८३.०९	६६२.५०
योजना देखभाल दुरूस्ती खर्च	२१३५.९८	२४६७.१३	२४२४.८९	३२०९.५३	३५९१.४०	३१६२.५८
विज देयके	३२०९.७९	३४४४.०६	३८३१.९०	४४८७.९५	३९१९.७३	४१४६.६४
पाण्याचे देयक	६७९.५०	६६७.४५	९३०.४८	१०२४.९२	८३१९.८६	८३७२.३५
संकिर्ण	१३०५.५८	१२१०.५२	१२३३.६६	१२१२.०५	२४५.६४	१७३.२५
एकूण	७६६३.६७	८१८६.६८	८८४५.९२	१०३६५.२८	१६५५९.७२	१६५१७.३२
घसारा १०%	७६६.३६७	८१८.६६८	८८४.५९२	१०३६.५२८	१६५५.९७२	१६५१.७३२
एकूण	८४३०.०४	९००५.३५	९७३०.५१	११४०१.८१	१८२१५.६९	१८१६९.०५

- सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात महसुली खर्चात वाढ झाल्याचे दिसुन येते.
- सन २०२५-२६ मध्ये पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी (MMRDA कडील पाण्यासह) आलेल्या खर्चानुसार सरासरी पाणीपट्टी दराची गणना

	तपशील	युनिट	खर्च रुपये मध्ये
A	२०२५-२६ पाणीपुरवठा महसुली खर्च		१८१६९०५२००.००
			१८१६९०५२००.००
	मनपा स्त्रोतातून उपलब्ध होणारे पाणी	MLD	२३०
	MMRDA मार्फत उपलब्ध होणारे पाणी	MLD	१५०.००
B	एकूण उपलब्ध होणारे पाणी	MLD	३८०.००
	प्रती १००० लिटर		३८००००
	वर्षाचे दिवस		३६५
	प्रती १००० लिटर करीता अपेक्षीत खर्च	१८१६९०५२००/(३८०*१०००*३६५)	
		१	१३.०९९५३२८
	प्रती वर्षांनी ३% वाढ	२	१३.४९२५१८७९
		३	१३.८९७२९४३५
		४	१४.३१४२१३१८
		५	१४.७४३६३९५८
		Average	१३.९०९४३९७४
		Water Rate	१३.९०

- महापालिका पाणी पुरवठा विभागाअंतर्गत पाणीपट्टी वसुली (रु. कोटी मध्ये)

सन	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
विशेष पाणीपट्टी	४०.०३	४६.०६	५३.५४	५४.३९	५८.००

- विशेष पाणीपट्टी वसुली ही प्रती वर्षी ८० % पर्यंतच होते.

- सन २००९ ते २०२६ या कालावधीत इंधन व साहित्याच्या बाबींमध्ये झालेली भाववाढ

सन	२००९	२०२६
प्रति युनीट विद्युत दर	रु. ३.५०	रु. ९.१५
रॉ वॉटर चार्जेस प्रती १००० लीटर	रु. ०.१५	रु. १.९८
मनुष्यबळाच्या प्रतीदिन मजूरीचा दर वाढीची टक्केवरी १८० ते २२० %	रु. ३००	रु. ८५०
साहित्य वाढीची टक्केवारी १४० ते १८० %		
केमीकल्स (ॲलम व क्लोरीन) इंडायसेस मध्ये सन २०१२ पासून आत्तापर्यंत ४४% वाढ झाली आहे.		
लेबर आणि साहित्य करीता प्रतिवर्षी ३% वाढ		

- पाणीपट्टी दर वाढीची कारणे
  - मागील २० वर्षात रु. ८/- प्रति १००० लिटर दराप्रमाणे ठोक स्वरूपात पाण्याचे दर आकारले जात होते.
  - सन २०२४ पासून MMRDA च्या सुर्या पाणी पुरवठा योजनेतून १६५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत असून पाण्याचा दर - रहिवासी रु.१३.४० व वाणिज्य रु.२६.८० प्रति १००० लिटर इतका आहे.
  - सदर दरात प्रती २ वर्षांनी ६% इतकी वाढ होणार आहे.
  - MMRDA च्या पाणी देयकापोटी रु.९१.४६ कोटी वार्षिक वाढीव खर्च सन २०२४ पासून येत आहे.
  - सन २०२५-२६ पाणीपट्टी महसुली मागणी रु. ७५.०२ कोटी असून वसूली ७९ % झाली आहे.
  - परिणामी योजनेवर होणारी एकूण महसुली वार्षिक तुट (१८१. ६९ - ५९.९२) = रु.१२१.७७ कोटी.
  - सन २०२६-२७ पाणीपट्टी महसुली मागणी रु. १४७.१६ कोटी आहे. सदरची मागणी ही रु. १८५ कोटी पर्यंत होणे आवश्यक आहे.
  - प्रतिवर्षी विजदेयक, पाटबंधारे विभागाकडील पाणी देयक, रसायने, देखभाल दुरूस्ती खर्च, मनुष्यबळ वेतन इत्यादी मध्ये सरासरी ५% वाढ होत असल्याने महसुली खर्चात प्रतिवर्षी वाढ होणार आहे.
  - वरील महसुली खर्चाचा व उत्पन्नाचा ताळमेळ घेता महापालिकेने प्रस्तावित केलेले पाणीपट्टीचे सुधारीत दर हे योग्य व वाजवी आहेत.
  - पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्याचे शासनाचे निर्देश आहेत.

- अन्य महापालिकांचे प्रचलीत पाणीपट्टी दर खालील प्रमाणे

अ.क्र.	महापालिका नाव	दर
१	मिरा-भाईंदर	निवासी -रु. १६/- , वाणिज्य - रु. ६५/- , प्रती १००० लीटर
२	कल्याण - डोंबिवली	रु. २५०/- प्रती सदनिका प्रती माह
३	पनवेल	रु.२७०/- प्रती सदनिका प्रती माह
४	ठाणे	प्रती झोपडी - रु.१३०/- प्रती माह, २५० - ५०० चौ.फुट - रु.२१०/- प्रती सदनिका
५	वसई-विरार	रु.२२४/- प्रती सदनिका प्रती माह (रु. १३.७८ प्रती १००० लीटर) रु.११६/- प्रती झोपडी प्रती माह

महानगरपालिका प्रशासनाने मागील तीन आर्थिक वर्षांतील प्रत्यक्ष खर्चाचा अभ्यास करून व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पाणीपट्टी दरात सुधारणा करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय राजवटीत तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र. १९९८, दि. १७.०१.२०२५ अन्वये मंजूर केला होता. तथापि, काही लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांनी विरोध दर्शविल्यामुळे सदर निर्णयाच्या अंमलबजावणीस तात्पुरती स्थगिती दिली होती.

त्यानंतर पाणीपुरवठा विभागाच्या उत्पन्न-खर्चाचा फेरआढावा घेतल्यानंतर, वाढत्या महसुली भारामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. ०१.०४.२०२६ पासून सदर प्रशासकीय ठरावाची अंमलबजावणी करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०२५ मध्ये दिले. त्यानुसार सुधारित पाणीपट्टी दर लागू करून ग्राहकांना देयके वितरित करण्यात आली असून काही ग्राहकांनी त्यानुसार पाणीपट्टी कराचा भरणाही केला आहे.

प्रशासनाने वरील प्रमाणे पाणीपट्टी दरवाढीबाबत केलेले सादरीकरण व दिलेले स्पष्टीकरण विचारात घेता मागील २० वर्षापासून पाणीपट्टीच्या दरात कोणतीही दरवाढ करण्यात आली नव्हती. वरील सादरीकरणात सन २००९ ते २०२६ या १७ वर्ष कालावधीत शासनाच्या पाटबंधारे विभागाचे अशुध्द पाण्याच्या दरात, विज देयकांमध्ये, शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या रसायनांच्या दरात, मनुष्यबळ तसेच इंधन व अन्य सर्व साहित्याच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या सर्व वाढींमुळे पाणी पुरवठा योजना तोट्यात येत असल्याने तत्कालीन आयुक्त यांनी योजना चालविण्यासाठी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाचा अभ्यास करून व शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पाणीपट्टीचे दर सुधारीत करण्याचा निर्णय घेतला आहे. व त्यानुसार प्रशासनाने पाणीपुरवठा ग्राहकांना सुधारीत दराप्रमाणे पाणीपट्टी मागणी देयके बजाविली आहेत.

तथापी वाढीव पाणीपट्टीबाबत चर्चा होऊन काही सदस्य ती रद्द करण्याची मागणी करीत असल्याने सदर विषयावर सविस्तर चर्चेनंतर शासनाचे मार्गदर्शन घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

ठराव / निर्णय :-

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत नळ जोडणीधारकांना दिल्या गेलेल्या सुधारीत पाणीपट्टी देयकांवर चर्चा करून सदर सुधारीत पाणीपट्टी देयके रद्द करण्याबाबत सन्मा. सदस्य श्रीमती प्रज्ञा पाटील व श्री. अशोक शेळके यांचे प्रस्तावाचे वाचन सभागृहात करण्यात आले.

प्रशासनाने वरील प्रस्तावात नमुद केलेल्या माहितीनुसार पाणीपट्टी दरात सुधारणा ही प्रशासकीय काळात प्रशासकीय ठराव क्र. १९९८, दि.१७.०१.२०२५ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी ३ महिन्यांपुर्वी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार नळजोडणी धारकांना सुधारीत दराने पाणीपट्टी देयके बजाविण्यात आली आहेत. आणि काही ग्राहकांनी पाणीपट्टीचा भरणा देखील केलेला आहे. त्यामुळे ही दरवाढ प्रशासकीय दृष्ट्या रद्द करण्यासाठी शासनाची मान्यता आवश्यक वाटते असे मा. महापौर महोदय यांनी नमुद केले. याकरीता प्रशासनाने केलेला पाणीपट्टी दर सुधारणेचा प्रस्ताव विखंडीत करण्यासाठी मा. राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा असा ठराव सभा घेत आहे.

पाणीपुरवठा योजना शाश्वतपणे चालविण्यासाठी शासनामार्फत विशेष आर्थिक सहाय्य / अनुदान उपलब्ध करून देण्याबाबतही विनंती करण्यात यावी. MMRDA आकारीत असलेल्या पाण्याच्या दरासह शासनाच्या पाटबंधारे विभगाामार्फत पाणी पुरवठा योजनेकरीता अशुध्द पाण्याचा दर कमी करण्याची तसेच विज देयकांमधील होत असलेली दराची आकारणी कमी दराने करणेबाबत शासनास विनंती करावी. सदर बाबत शासनामार्फत जे मार्गदर्शन देण्यात येईल त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

सुचकाचे नाव - प्रविण शेट्टी

व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव - (प्रफुल्ल साने)

व स्वाक्षरी -

अनुकुल संख्या - ..... प्रतिकुल संख्या - ..... तटस्थ संख्या - .....

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजुर/~~नामंजुर~~

(**अजीव यशवंत पाटील**)
महापौर तथा पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व गावठाण क्षेत्रातील जमिनींचे भूमापन प्रक्रिया करून प्रॉपर्टी कार्ड देणेबाबत.

ठराव/ निर्णय :- सदरचा प्रस्ताव सन्माननीय नगरसेवक श्री. गणेश मंजुळा बाळकृष्ण पाटील आणि श्री. परेश प्रभाकर किणी यांच्या संयुक्त पुढाकाराने सभागृहात चर्चेसाठी मांडण्याआधी महासभेच्या कामकाजादरम्यान विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय नगरसेवकांनी महासभेतून सभात्याग (Walkout) केला. तरीही श्री. गणेश मंजुळा बाळकृष्ण पाटील यांना या प्रस्तावावर आपली भूमिका व म्हणणे मांडण्यासाठी सांगण्यात आले. परंतु, सभागृहात सन्मा. सदस्य उपस्थित नव्हते. सदरचा प्रस्ताव श्री.परेश प्रभाकर किणी यांनी देखील 'ज' खाली सादर केला होता. त्यावर त्यांनी आपले सविस्तर मत मांडले. त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील सर्व गावठण क्षेत्रातील जमिनीचे भूमी अभिलेख विभागामार्फत भुमापन करण्यासाठी परवानगी देण्यात येत असून गावठण क्षेत्राातील मालमत्ता धारकांना प्रॉपर्टी कार्ड देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मालमत्ता व्यवस्थापन विभागाने यावर अमंलबजावणी करावी असेही सुचित करण्यात आले.

सुचक - परेश किणी

अनुमोदक - प्रफुल्ल साळवे

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ **सभा सुचना क्र. १०** **दिनांक : १७/०७/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे करावयाच्या उपाययोजना संदर्भात विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव/ निर्णय :- मा. महासभेच्या बैठकीत श्रीम.प्रज्ञा कमलाकर पाटील व श्री.मनोज गोपाळ पाटील यांनी वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठीचा प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर मांडला. परंतू, त्यावेळेस "ज" चा प्रस्ताव मांडलेले सन्मा. सदस्य श्रीम.प्रज्ञा कमलाकर पाटील व श्री.मनोज गोपाळ पाटील व इतर श्री.अशोक शेळके, श्री.महेश सरवणकर, श्री.निलेश चौधरी, श्री.जितेंद्र पाटील, ॲड.दर्शना त्रिपाठी, श्री.चंद्रकांत गोरीवले, श्री.मेहूल शहा, श्री.गौरव राऊत, श्री.जितेश राऊत, श्रीम.सान्वी यंदे, श्रीम.अपर्णा पाटील, श्रीम.रीना वाघ, श्रीम.योगिता गवळी-करंजकर, श्री.जयप्रकाश सिंह, श्रीम.स्मिता पाटील, श्री.गणेश पाटील, श्री.जयप्रकाश वझे, श्री.प्रदीप पवार, श्रीम.निम्मी जोशी, श्री.शरद सुर्वे, श्रीम.बबिता सिंग, श्री.रवी पुरोहित, श्रीम.मीरा निकम, श्री.अभय कक्कड, श्रीम.रितू चौबे, श्री.किशोर पाटील, श्रीम.कल्पना नागपुरे, श्रीम.एकता सिंह, श्रीम.अंजू तिवारी, श्रीम.संजना भायदे, श्रीम.बंटी तिवारी, श्रीम.नमिता पवार, श्रीम.रसिका ढगे श्री.पंकज देशमुख हे सभागृहात अनुपस्थित असलेमुळे सदर विषयावर मा. महापौर यांनी अतिवृष्टीमुळे करावयाच्या आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करणेबाबत प्रशासनाला सुचित करण्यात आले.

सुचक - नरेंद्र पाटील

अनुमोदक - प्रफुल्ल साने

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)